Volume - 6 (2025)
Special Issue - 1 (March)
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN 2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# बौद्धिक संपदा कायदा आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याची जोपासना

संशोधक विद्यार्थ्यांनी
**कु. अस्मिता संजय ढवस**
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,
मारेगाव 445303
Email Id : asmitadhawas29@gmail.com

---

**सारांश :**

*मानवी मनाचा व बुद्धीच्या मदतीने निर्माण झालेली मालमत्ता किंवा माणसाची शोध घेण्याची आणि शोध लावण्याची विशेष क्षमता म्हणजे बौद्धिक संपदा होय. 21 वे शतक हे संशोधनाच्या क्षेत्रामध्ये अत्यंत वेगाने वाढत जाणारे क्षेत्र आहे. दररोज नवनवीन शोध लागतात. सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, ऐतिहासिक, वैज्ञानिक, मेडिकल या सर्व क्षेत्रांमध्ये संशोधनामुळे अनेक नवीन तथ्य समोर येतात. त्यामुळे मानवी समाजाला आपले जीवन जगण्यात अनेक सोयी-सुविधा उपलब्ध होत आहे. आज संशोधनामुळे माणसाच्या वेळेची बचत होत आहे. नवनवीन वैज्ञानिक शोधामुळे तंत्रज्ञानाचा विकास होत आहे, मेडिकल क्षेत्रातील संशोधनामुळे मानवी शरीर स्वस्थ आणि निरोगी राहू शकत आहे. नवनवीन तंत्रामुळे मानवी जीवनशैली हळूहळू प्रगतीच्या दिशेने वाटचाल करू शकत आहे. असे अनेक प्रकारचे फायदे मानवी जीवनाला संशोधनामुळे मिळत आहे.*

*मनुष्यातील ही संशोधनाची भावना जागृत ठेवण्यासाठी, नवनवीन शोधांचा विकास आणि त्या शोधाच्या संरक्षणाची जबाबदारी वाढवण्यासाठी आज बौद्धिक संपदा कायदा बळकट करण्याची वेळ आली आहे. बौद्धिक संपदा कायदा हा व्यक्तीला त्यांच्या संशोधनाच्या क्षेत्रामध्ये सुरक्षितता देण्याचे कार्य करतो. बौद्धिक संपदा कायदा हा व्यक्तीला त्यांच्या व्यक्तिगत अधिकारांचे संरक्षण आणि नवीन संशोधनाला वाव देण्याचे कार्य करतो. त्यामुळे व्यक्तीला आपले आर्थिक हक्क जोपासण्यास आणि संशोधनावर स्वतःची मालकी ठेवण्यास मदत होते.*

*बौद्धिक संपदा कायद्याद्वारे संशोधकाला कॉपीराईटचा अधिकार, पेटंट अधिकार, ट्रेडमार्क अधिकार, औद्योगिक, डिझाईन अधिकार, भौगोलिक उत्पत्तीचा अधिकार, व्यापारी गुप्तता अधिकार, या प्रकारचे सहा अधिकार मिळतात. ज्यामुळे व्यक्तीस्वातंत्र्याची जोपासना होते.*

---

**प्रस्तावना :**

देशाचा आणि राष्ट्राचा विकास घडवून आणायचा असेल तर सर्वप्रथम व्यक्तीचा विकास झाला पाहिजे. व्यक्तीच्या हिताचे संरक्षण केले पाहिजे, त्याला तणावमुक्त वातावरण निर्माण करून दिले पाहिजे, त्यांचे सामाजिक आणि आर्थिक हक्क पूर्णपणे सुरक्षित असले पाहिजे, तेव्हाच मनुष्य प्रथम आपला विकास साधेल. स्वविकासातून व्यक्तीला इतरांचा विकास साधता येईल, समाजाचा विकास साधता येईल, पर्यायाने व्यक्ती स्वविकासातून देशाच्या विकासामध्ये भर घालू शकतो. बौद्धिक संपदा कायदा याचप्रकारच्या व्यक्तीच्या विकासात्मक परिस्थितीमध्ये भर टाकणारा कायदा आहे. ज्याद्वारे व्यक्तीचे अधिकार सुनिश्चित व सुरक्षित करण्यात येत असून त्यांच्या आणि देशाच्या विकासाला वाव मिळतो.

कॉपीराईटचा अधिकार हा संशोधक आणि कलात्मक प्रकारचा अधिकार आहे, जो इतरांनी ती माहिती

पुन्हा प्रसिद्ध करू नये यावर रोख लावतो. पेटंट अधिकार संशोधनाच्या मूलभूत संशोधनासाठी दिला जातो, ज्यावर त्यांची पूर्ण मालकी असते. ट्रेडमार्क अधिकाराद्वारे ज्या व्यावसायीकाने आपले स्वतःचे चिन्ह किंवा संकेत तयार केले आहे, त्यांच्या सुरक्षेसंबंधीचा अधिकार आहे. औद्योगिक डिझाईन अधिकाराद्वारे उद्योजकांचे वस्तूच्या किंवा उत्पादनाशी संबंधित डिझाईन, रंग, रेषा, आकार वापरण्यासंबंधी पूर्ण स्वातंत्र्य देणारा अधिकार आहे. भौगोलिक उत्पन्न अधिकार हा व्यक्तिगत नसून प्रादेशिक तत्वावर आधारित आहे. व्यापारी गुप्तता अधिकार हा व्यापारी हितांच्या सुरक्षेसाठी आणि व्यापाऱ्यांच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

या प्रकारे बौद्धिक संपदा कायदा हा व्यक्तिविकासासाठी प्रेरक आहे. व्यक्तींच्या हिताच्या, विकासाच्या आणि संशोधनाच्या वाढीमध्ये या कायद्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. यापैकी प्रत्येक अधिकाराचे विस्तृत विश्लेषण पुढे करण्यात आलेले आहे

**संशोधकाची उद्दिष्टे :**

१. बौद्धिक संपदा कायदा आणि व्यक्ती स्वातंत्र्य यांच्यातील सहसंबंधाची माहिती देणे

२. 21 व्या शतकामध्ये बौद्धिक संपदा कायद्याच्या बळकटीकरणाची गरज वाढू लागली आहे. त्यामुळे व्यक्ती स्वातंत्र्याच्या उद्देशाने यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

३. इंटरनेट मुळे माहिती तंत्रज्ञानामध्ये वाढ झाली आहे, या तंत्रज्ञानाच्या विकासातून संशोधनाचे क्षेत्र वाढत चालले आहे. त्याचप्रमाणे संशोधनाच्या चोरीची समस्या निर्माण झाली आहे, त्यासाठी इंटरनेटच्या माध्यमातून योग्य त्या सुधारणा केल्या पाहिजे.

४. बौद्धिक संपदा कायद्यातून जे अधिकार संशोधकांना मिळतात त्या अधिकारांच्या सुरक्षेसाठी विशेष प्रयत्न करून संशोधनाला वाव देणे गरजेचे आहे, त्यांच्या अभ्यास करणे.

५. संशोधन क्षेत्राद्वारे देशाच्या विकासासाठी विशेष प्रयत्न केले जातात, त्यामुळे देशाच्या आर्थिक हिताची जोपासना होऊन देशाच्या समृद्धीस अनुकूल वातावरणाची निर्मिती करता येते.

**संशोधनाची गृहीतके** :

१. बौद्धिक संपदा अधिकार व्यक्तिगत स्वातंत्र्याशी निगडित आहे.

२. बौद्धिक संपदा अधिकारामुळे नवीन शोध कलात्मक कृती यांची निर्मिती होण्यास प्रोत्साहन मिळत आहे. त्यांच्या हक्कांच्या संरक्षणामुळे कला क्षेत्रामध्ये विकास घडून येत आहे.

३. बौद्धिक संपदा अधिकारामुळे लेखकांना, कलाकारांना आर्थिक लाभ मिळत आहे.

४. बौद्धिक संपदा अधिकारामुळे संशोधक, साहित्यक त्यांच्या अधिकाऱ्यांना कायद्याचे पाठबळ मिळाले आहे.

**संशोधन पद्धती** :

प्रस्तुत शोधनिबंधात बौद्धिक संपदा अधिकार कायदा याचा शोध घेत असताना संपूर्ण माहिती ही दुय्यम माहिती स्त्रोतांद्वारे घेण्यात आलेली आहे. संबंधित शोध निबंधाच्या लिखाणाकरिता वर्तमानपत्र, पुस्तके, शासनाचे

अहवाल, मासिके, इंटरनेटवरील विविध साईट्स, यांच्या माध्यमातून संपूर्ण वर्णन करण्यात आलेले आहे. या सर्व संदर्भाच्या आधारे प्रस्तुत शोधनिबंधाचे लेखन पूर्णपणे केलेले आहे.

**बौद्धिक संपदा कायदा म्हणजे काय ?**

बौद्धिक संपदा अधिकाराची सुरुवात ही 1950 नंतरच्या वैज्ञानिक आणि माहिती तंत्रज्ञानाच्या विकासामुळे झालेली आहे. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे नवनवीन शोध लागू लागले. त्या शोधांच्या सुरक्षेसाठी आणि संशोधकांच्या आर्थिक हिताच्या जोपासणेसाठी बौद्धिक संपदा कायदा निर्माण करण्यात आला.

संयुक्त राष्ट्र संघाच्या 15 विशेष एजन्सीपैकी जागतिक बौद्धिक संपदा कायदा ही एक विशेष एजन्सी आहे. या संघटनेची स्थापना 1967 च्या अधिवेशनानुसार करण्यात आली. संयुक्त राष्ट्रांच्या सर्व सभासद राष्ट्रांचा समावेश या संघटनेत होतो. ही संघटना जगभरातील देश आणि आंतरराष्ट्रीय संघटनांशी सहकार्य करून "बौद्धिक संपत्तीच्या" संरक्षण आणि प्रसाराचे नियमन करीत आहे.

भारत सुद्धा या संघटनेच्या सभासद असून तो "बौद्धिक संपदा" सूचीमध्ये 2019 नुसार 36 क्रमांकावर होता. 2018 मध्ये तो 44 व्या स्थानावर होता. ही सुची प्रसिद्ध करण्याचे काम यु.एस.चेम्बर ऑफ कॉमर्स ही संघटना दरवर्षी करत असते.

**बौद्धिक संपदा अधिकाराचे प्रकार :**

बौद्धिक संपदा अधिकारांमध्ये कॉपीराईट, पेटंट, ट्रेडमार्क, औद्योगिक डिझाईन अधिकार, भौगोलिक उपत्तीचा अधिकार, व्यापारी गुप्तता, या सर्वांचा समावेश होतो. त्यांची सविस्तर माहिती पुढील प्रमाणे आहे.

**1. कॉपीराईट :**

कॉपीराईट हा शब्द रचनाकारांच्या साहित्यिक कृती आणि कलात्मक कार्यासाठी त्यांना मिळालेल्या अधिकारांचे वर्णन करण्यासाठी वापरण्यात येतो. भारतामध्ये कॉपीराईट कायदा ला 1957 मध्ये निर्माण करण्यात आला होता. यामध्ये 2012 ला दुरुस्ती करण्यात आली. कॉपीराईट कायद्याच्या संरक्षणाची जबाबदारी ही मानवी संसाधन विकास मंत्रालयाची असते. कॉपीराईट अधिकार हा चित्रपट, डेटाबेस, विद्यापन, तांत्रिक चित्र, कम्प्युटर प्रोग्रॅम, मूर्ती, कला, चित्रकला, संगीत आणि पुस्तक या सर्व घटकांच्या सुरक्षतेसाठी असतो. ज्यामुळे लेखकाच्या लेखनावर आणि संशोधकांच्या संशोधनातील माहितीवर त्यांची पूर्णपणे मालकी असते. त्यामुळे इतर व्यक्ती त्यांच्याकडून ती माहिती चोरी शकत नाही. बौद्धिक संपत्ती अधिकारामुळे व्यक्तीला आपल्या आर्थिक हिताची जोपासना करता येते. कॉपीराईट ही संज्ञा विषयाच्या प्रस्तुतीकरणासाठी मांडली जाते.

लेखकांची कृती किंवा कलावंतांची कला ही त्यांची एक प्रकारे खाजगी संपत्ती असते. तो आपली पूर्ण शक्ती लावून ती कलाकृती निर्माण करत असतो, त्यामुळे त्यांची जोपासना करणे हे त्यांचे आद्य कर्तव्य असते. सामान्यपणे कलाकारांचे कलाकृती, विक्री इत्यादी बाबत विशिष्ट काळापूरता निर्मात्यालाच दिलेला असतो, ही संज्ञा विषयाच्या प्रस्तुतीकरणासाठी वापरण्यात येते.

**२. पेटंट :**

संशोधकाला त्यांच्या मूलभूत संशोधनासाठी पेटंट दिल्या जाते. जेव्हा संशोधक समाजाला आणि राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने एखादे संशोधन करतो तेव्हा त्याला पेटंट प्रदान करण्यात येते. त्या पेटंटचे अधिकार तो एखाद्या कंपनीला सहमतिने देऊ शकतो. आणि त्यातून आर्थिक लाभ घेऊ शकतो.

उदा. जर एखाद्या संशोधकाने एखाद्या औषधाचा शोध लावला असेल तर तो ते औषध बनविण्यासाठी एखाद्या कंपनीला अधिकार देऊ शकतो, त्याच सोबत औषध निर्माण होण्यासाठी योग्य निर्देश आणि जबाबदारी पूर्वक कार्याचे आदेश देऊ शकतो. पेटंट कायदा 1970 मध्ये बनवण्यात आला होता आणि 2006 मध्ये त्यामध्ये सुधारणा करण्यात आल्या. पेटंट च्या संरक्षण आणि नियमनाची जबाबदारी ही वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाची असते. पेटंट विषयी कागदपत्राची उपलब्ध असलेल्या संशोधनाची तांत्रिक माहिती पूर्णपणे एखाद्या उद्योजकाला तो देऊ शकतो.

**३. ट्रेडमार्क :**

आपल्या वस्तू आणि सेवा यांच्या उच्च गुणवत्तेच्या प्रमाणासाठी ट्रेडमार्क सर्वात महत्त्वाचा असतो. ट्रेडमार्क हा एक संकेत असतो, ज्याद्वारे उद्योगातील वस्तू आणि सेवा यांना इतर उद्योगांनपेक्षा आपली वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी तयार करण्यात येते. ट्रेडमार्कचे चिन्ह तयार करण्यासाठी संबंधित व्यावसायिकाला पूर्ण स्वातंत्र्य असते. ट्रेडमार्क परंपरा ही प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. कारण पूर्वी जेव्हा कारागीर वस्तू तयार करायचे तेव्हा ते आपल्या वस्तू, सेवा, उत्पादनावर सही किंवा विशिष्ट प्रकारचे चिन्ह लावायचे. त्यामुळे ती वस्तू तयार करणाऱ्या व्यक्तीची ओळख व्हायची. यासाठी ट्रेडमार्क अधिनियम 1999 सद्यस्थितीमध्ये उपलब्ध आहे. त्यांच्या नियमनाचे अधिकार वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाकडे दिलेले आहे. ट्रेडमार्क हा एक प्रकारचा ब्रँड असतो. ज्यामुळे एका माणसाची उत्पादक वस्तू किंवा सेवा इतरांपासून वेगळी ओळखता येणे सहज शक्य होते. यामध्ये आकार, तिचे वेष्टन, शब्द, अक्षर, आकडा, रंगसंगती, चिन्ह यांचा वापर करण्यात येतो.

**४. औद्योगिक डिझाईन अधिकार :**

वस्तूच्या सौंदर्यकरणासाठी ही संज्ञा वापरण्यात येते. यामध्ये सजावटी आणि सौंदयीकरण करून आपली वस्तू किंवा सेवा अधिक आकर्षक बनवण्यासाठी प्रयत्न केले जातात. वस्तूची आकृती, पेंन्ट, रेषा, रंग याचा वापर करण्यात येतो. औद्योगिक डिझाईन अधिकार, औद्योगिक वस्तूचे स्वरूप, शैली किंवा डिझाईन अतिक्रमणापासून संरक्षण करतात. यामध्ये वस्तूची नाविन्य पूर्तता जोपासण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातात. जसे की औषध निर्माणकरणाऱ्या कंपन्या 60 वर्षे आपली माहिती गुप्त ठेवण्याचा अधिकार तसेच औद्योगिक वस्तू यांना 20 वर्षे आपली माहिती गुप्त ठेवण्याचा अधिकार असतो. हा औद्योगिक डिझाईन अधिकार कायदा 2000 नुसार मिळतो. वाणिज्य आणि औद्योगिक मंत्रालयाद्वारे या कायद्याचे नियमन होते. यामध्ये पुढील वस्तूंचा समावेश होतो. साड्यांची डिझाईन, गाड्यांचा आकार, रंग, विविध वस्तूच्या आकृतीबंध ठरवण्याचा अधिकार मालकाला मिळतो.

**५. भौगोलिक उत्पत्तीचा अधिकार :**

काही भौगोलिक क्षेत्रामध्ये एखाद्या वस्तूला विशेष मागणी असते, हा अधिकार मालासाठी लागू होणारा अधिकार आहे. जो माल विशिष्ट भौगोलिक क्षेत्रामध्येच निर्मित असून त्यांचे गुण सर्वज्ञ समान असतात, यासाठी त्या मालाला जास्त मागणी असते. त्या मालाला प्रादेशिक ओळख मिळत असते. आणि त्याची वैशिष्ट्यपूर्ण रचना गुणधर्म यासाठी ती वस्तू प्रसिद्ध असते. भौगोलिक उत्पत्तीचा अधिकार हा व्यक्तिगत स्वातंत्र्याशी निगडित नसून तो भौगोलिक मर्यादितच म्हणजे प्रादेशिक स्वातंत्र्यावर आधारित आहे. हा अधिकार भौगोलिक वस्तू उत्पादन कायदा 1999 यानुसार लागू झाला असून त्या कायद्याच्या नियमनाची जबाबदारी ही सर्वस्वी वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाची असते. भौगोलिक वस्तूच्या उत्पत्तीची उदाहरणे म्हणजे बनारसी साडी, नागपूरची संत्री, मथुरा मधील पेढे, आग्र्यातील पेठा, तिरुपती मधील लाडू ही आहे. जी केवळ भौगोलिक उत्पादनाच्या आधारावर प्रसिद्ध असून तिला देश विदेशामध्ये मागणी असते.

**६. व्यापारी गुप्तता :**

बौद्धिक संपदा अधिकाराद्वारे व्यापारी गुप्ततेचा अधिकार मिळतो. व्यापारी व्यक्ती आपली माहिती लायसन्स च्या आधारे विकू शकतो. आपली माहिती इतरांना आर्थिक मोबदल्यात देण्याचा अधिकार हा व्यापाऱ्यांना असतो. त्यातून व्यापारी चांगला लाभ मिळवू शकतो. गुप्त माहितीचे अनअधिकृत रित्या अधिग्रहण करणे, गुप्त माहितीचा उपयोग आणि प्रकटीकरण करणे. दुसऱ्या व्यक्तीद्वारा इमानदार वाणिज्यिक प्रथाविरोधी अनुचित व्यवहार करणे आणि व्यापारी गुप्ततेचे उल्लंघन करणे या सर्व गोष्टी विरोधी कारवाई करण्याचा अधिकार हा व्यापाऱ्याला मिळत असतो. ट्रेडमार्क कायदा 1999 या संदर्भातील अधिकार व्यापाऱ्यांना मिळतात. या कायद्याच्या नियमनाची जबाबदारी ही वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाद्वारे निश्चित केल्या जाते.

**बौद्धिक संपदा अधिकाराचे महत्त्व :**

बौद्धिक संपदेच्या रक्षणासाठी प्रत्येक देशाचे आपले वेगवेगळे कायदे असतात. सर्वप्रथम यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रयत्न करण्यात आले होते. संयुक्त राष्ट्र संघाच्या प्रयत्नाने सर्व प्रकारच्या अधिकारांच्या रक्षणासाठी विविध कायदे करण्यात आले आहेत. जसे की कॉपीराईट कायदा 1957 (यामध्ये 2012 मध्ये दुरुस्ती करण्यात आली) पेटंट कायदा 1970 (या 2006 मध्ये दुरुस्ती करण्यात आली) औद्योगिक डिझाईन कायदा 2000, औद्योगिक वस्तू उत्पादन कायदा 1999, ट्रेडमार्क कायदा 1999, यासारखे कायदे निर्माण करण्यात आले.

**निष्कर्ष :**

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या पुढाकाराने निर्मित "बौद्धिक संपदा कायदा" हा आधुनिक काळातील एक विकासशील पाऊल समजण्यात येते. कारण त्यामुळे विकासाला अनुकूल असे वातावरण निर्माण होण्यास फायदा झाला आहे. कारण या कायद्यामुळे संशोधकाला त्यांच्या संशोधनाच्या गुप्ततेचा अधिकार मिळाला असून त्यासोबतच त्याला त्यांचे आर्थिक हित साध्य करता येणे सहज शक्य झाले आहे. संशोधकाला त्यांच्या कलानिर्मितीमुळे अर्थार्जन होऊ लागल्याने त्याला पुन्हा संशोधन करण्याची त्यांची जिज्ञासा वाढू लागली आहे.

त्यामुळे संशोधकाला त्यांच्या हक्काची सुरक्षितता वाढली आहे. त्यामुळे नवनवीन संशोधन विकास होऊ लागले आहे. ज्यातून देशाच्या विकासाला चालना मिळाली आहे. नवनवीन वैज्ञानिक शोध, तंत्रविज्ञानातील शोध, सामाजिक, आर्थिक, राजकीय शोध आणि कलेच्या विकासाला विशेष प्रोत्साहन मिळू लागले आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


- आगलावे प्रदीप, संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्र, विद्या प्रकाशन नागपूर.
- गोविलकर डॉ. वि. म., “बौद्धिक संपदा अधिकार” डायमंड पब्लिकेशन पुणे.
- नेहाडे डॉ. जयश्री जाधव, डॉक्टर सतीश चव्हाण, डॉ. हिरालाल, “बौद्धिक संपदा हक्क स्वरूप आणि समस्या” प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.
- नाईकवडे फारुख, “बौद्धिक संपदा आणि भारत” दैनिक लोकसत्ता.
- https://www.ipindia.gov.in
- https://copyright.gov.in